# JP-1-11

This booklet contains 20 pages.
इस पुस्तिका में 20 पृष्ट हैं ।

**PAPER I / प्रश्न-पत्र I**
**Marathi Language Supplement**
**मराठी भाषा परिशिष्ट**
**PART IV & V / भाग IV & V**

**Test Booklet Code**
**परीक्षा पुस्तिका संकेत**

**A**

**Test Booklet No.**
**परीक्षा पुस्तिका संख्या**

**359501**

**Do not open this Test Booklet until you are asked to do so.**
**इस परीक्षा पुस्तिका को तब तक न खोलें जब तक कहा न जाए ।**
**Read carefully the Instructions on the Back Cover (Page 19 & 20) of this Test Booklet.**
**इस परीक्षा पुस्तिका के पिछले आवरण (पृष्ठ 19 व 20)पर दिए निर्देशों को ध्यान से पढ़ें ।**

**For instructions in Marathi see Page 2 of this Booklet. / मराठी में निर्देशों के लिए इस पुस्तिका का पृष्ठ 2 देखें ।**

## *INSTRUCTIONS FOR CANDIDATES*

1. This booklet is a supplement to the Main Test Booklet for those candidates who wish to answer **EITHER** Part IV (Language I) **OR** Part V (Language II) in **MARATHI** language, but **NOT BOTH**.
2. Candidates are required to answer Parts I, II, III from the Main Test Booklet and Parts IV and V from the languages chosen by them.
3. Questions on English and Hindi languages for Part IV and Part V have been given in the Main Test Booklet. Language Supplements can be asked for separately.
4. Use **Blue / Black Ball Point Pen only** for writing particulars on this page / marking responses in the Answer Sheet.
5. The CODE for this Language Booklet is **A**. Make sure that the CODE printed on **Side-2** of the Answer Sheet and on your Main Test Booklet is the same as that on this Language Supplement Booklet. In case of discrepancy, the candidate should immediately report the matter to the Invigilator for replacement of the Language Supplement Test Booklet.
6. This Test Booklet has **two** Parts, IV and V, consisting of 60 Objective Type Questions, each carrying 1 mark :
   Part-IV : Language I - (Marathi) (Q. 91 to Q. 120)
   Part-V : Language II - (Marathi) (Q. 121 to Q. 150)
7. Part-IV contains 30 questions for Language-I and Part-V contains 30 questions for Language-II. In this Test Booklet, only questions pertaining to Marathi language have been given. **In case the language/s you have opted for as Language-I and/or Language-II is a language other than Marathi, please ask for a Test Booklet that contains questions on that language. The languages being answered must tally with the languages opted for in your Application Form.**
8. **Candidates are required to attempt questions in Part -V (Language-II) in a language other than the one chosen as Language-I (in Part-IV) from the list of languages.**
9. Rough work should be done only in the space provided in the Test Booklet for the same.
10. The answers are to be recorded on the OMR Answer Sheet only. Mark your responses carefully. No whitener is allowed for changing answers.

## *परीक्षार्थियों के लिए निर्देश*

1. यह पुस्तिका मुख्य परीक्षा पुस्तिका की एक परिशिष्ट है, उन परीक्षार्थियों के लिए जो **या** तो भाग IV (भाषा I) **या** भाग V (भाषा II) **मराठी** भाषा में देना चाहते हैं, लेकिन **दोनों नहीं** ।
2. परीक्षार्थी भाग I, II, III के उत्तर मुख्य परीक्षा पुस्तिका से दें और भाग IV व V के उत्तर उनके द्वारा चुनी भाषाओं से ।
3. अंग्रेज़ी व हिन्दी भाषा पर प्रश्न मुख्य परीक्षा पुस्तिका में भाग IV व भाग V के अन्तर्गत दिए गए हैं । भाषा परिशिष्टों को आप अलग से माँग सकते हैं ।
4. इस पृष्ठ पर विवरण अंकित करने एवं उत्तर पत्र पर निशान लगाने के लिए **केवल नीले/काले बॉल पॉइंट पेन** का प्रयोग करें ।
5. इस भाषा पुस्तिका का **संकेत है A** । यह सुनिश्चित कर लें कि इस भाषा परिशिष्ट पुस्तिका का संकेत, उत्तर पत्र के **पृष्ठ-2** एवं मुख्य परीक्षा पुस्तिका पर छपे संकेत से मिलता है । अगर यह भिन्न हो तो परीक्षार्थी दूसरी भाषा परिशिष्ट परीक्षा पुस्तिका लेने के लिए निरीक्षक को तुरन्त अवगत कराएँ ।
6. इस परीक्षा पुस्तिका में **दो** भाग IV और V हैं, जिनमें 60 वस्तुनिष्ठ प्रश्न हैं, जो प्रत्येक 1 अंक का है :
   भाग-IV : भाषा I - (मराठी) (प्र. 91 से प्र. 120)
   भाग-V : भाषा II - (मराठी) (प्र. 121 से प्र. 150)
7. भाग-IV में भाषा-I के लिए 30 प्रश्न और भाग-V में भाषा-II के लिए 30 प्रश्न दिए गए हैं । इस परीक्षा पुस्तिका में केवल मराठी भाषा से संबंधित प्रश्न दिए गए हैं । **यदि भाषा-I और/या भाषा-II में आपके द्वारा चुनी गई भाषा(एँ) मराठी के अलावा है तो कृपया उस भाषा वाली परीक्षा पुस्तिका माँग लीजिए । जिन भाषाओं के प्रश्नों के उत्तर आप दे रहे हैं वह आवेदन पत्र में चुनी गई भाषाओं से अवश्य मेल खानी चाहिए ।**
8. **परीक्षार्थी भाग-V (भाषा-II) के लिए, भाषा सूची से ऐसी भाषा चुनें जो उनके द्वारा भाषा I (भाग-IV) में चुनी गई भाषा से भिन्न हो ।**
9. रफ कार्य परीक्षा पुस्तिका में इस प्रयोजन के लिए दी गई खाली जगह पर ही करें ।
10. सभी उत्तर केवल OMR उत्तर पत्र पर ही अंकित करें । अपने उत्तर ध्यानपूर्वक अंकित करें । उत्तर बदलने हेतु श्वेत रंजक का प्रयोग निषिद्ध है ।

Name of the Candidate (in Capitals) : ____________________
परीक्षार्थी का नाम (बड़े अक्षरों में) :

Roll Number : in figures ____________________
अनुक्रमांक : (अंकों में)
: in words ____________________
: (शब्दों में)

Centre of Examination (in Capitals) : ____________________
परीक्षा केन्द्र (बड़े अक्षरों में) :

Candidate's Signature : ____________________ Invigilator's Signature : ____________________
परीक्षार्थी के हस्ताक्षर : निरीक्षक के हस्ताक्षर :

Fascimile signature stamp of
Centre Superintendent ____________________

SEAL

ही पुस्तिका 20 प्रष्ठ आहे.

# JP-1-11

**प्रश्नपत्रिका I**

**मराठी भाषा पुरवणी**

**भाग IV आणि V**

**चाचणी पुस्तिका कोड**

**A**

**ही पुस्तिका उघडायला सांगेपर्यंत ती उघडू नका.**

**या पुस्तिकेच्या मलपृष्ठावरील (19 आणि 20) सूचना काळजीपूर्वक वाचा.**

***परीक्षार्थींसाठी सूचना :***

1. ही पुस्तिका मुख्य चाचणी पुस्तिकेची पुरवणी असून ती अशा परीक्षार्थींकरिता आहे, की जे **मराठी** भाषेतील भाग IV (भाषा I) **किंवा** भाग V (भाषा II) **यांपैकी एकाची** उत्तरे लिहू इच्छितात, **दोन्हींची नव्हे**.
2. परीक्षार्थींनी मुख्य चाचणी पुस्तिकेतील भाग I, भाग II आणि भाग III सोडवायचा आहे आणि त्यांनी निवडलेल्या भाषेतील भाग IV आणि V सोडवायचा आहे.
3. भाग IV आणि V यांमधील इंग्लिश आणि हिन्दी भाषांवरील प्रश्न मुख्य चाचणी पुस्तिकेत दिलेले आहेत. पुरवण्या स्वतंत्रपणे मागून घेता येतील.
4. या पृष्ठावर माहिती लिहिण्यासाठी/प्रतिक्रिया नोंदवण्यासाठी **केवळ निळे/काळे बॉल पॉइंट पेनच** वापरा.
5. या भाषा पुस्तिकेचे **कोड A** आहे. उत्तर पत्रिकेच्या **बाजू-2** वर छापलेले कोड आणि या भाषा पुरवणी पुस्तिकेवरील कोड एकच आहे, याची खात्री करून घ्या. जर काही विसंगती असेल त. परीक्षार्थीने ती ताबडतोब पर्यवेक्षकास दाखवावी आणि भाषा पुरवणी पुस्तिका बदलून मागावी.
6. या चाचणी पुस्तिकेत IV आणि V असे **दोन** भाग आहेत. त्यांमध्ये **60** वस्तुनिष्ठ पद्धतीचे प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास एक गुण आहे :

   **भाग IV : भाषा I – (मराठी)** *(प्र. 91 ते 120)*

   **भाग V : भाषा II – (मराठी)** *(प्र. 121 ते 150)*
7. भाग IV मध्ये भाषा I साठी 30 प्रश्न आहेत आणि भाग V मध्ये भाषा II साठी 30 प्रश्न आहेत. या चाचणी पुस्तिकेत केवळ मराठी भाषेशी संबंधित प्रश्न दिलेले आहेत. **जर तुम्ही भाषा I व/वा भाषा II साठी निवडलेली भाषा मराठी पेक्षा वेगळी असेल, तर कृपया त्या भाषेवरील प्रश्न असलेल्या चाचणी पुस्तिकेची मागणी करा. ज्या भाषेची उत्तरे तुम्ही लिहीत आहात ती भाषा आणि तुमच्या अर्जामध्ये निवडलेली भाषा या एकच असल्या पाहिजेत.**
8. **भाग V (भाषा II) याकरिता असलेली भाषा ही भाषांच्या यादीमधील निवडलेली भाषा I (IV भागातील) पेक्षा निराळी असली पाहिजे.**
9. चाचणी पुस्तिकेमध्ये कच्चा आराखडा करण्यासाठी नेमून दिलेल्या जागेतच तो करावा.
10. OMR उत्तर पृष्ठावरच उत्तरे नोंदवायची आहेत. तुमच्या प्रतिक्रिया काळजीपूर्वक नोंदवा. उत्तरात बदल करण्यासाठी पांढरा रंग (whitener) वापरण्याची परवानगी नाही.

परीक्षार्थीचे नाव : ______________________

अनुक्रमांक : अंकांमध्ये : ______________________

: शब्दांमध्ये : ______________________

परीक्षाकेंद्र : ______________________

परीक्षार्थीची सही : ______________ पर्यवेक्षकाची सही : ______________

Facsimile signature stamp of

Centre Superintendent ______________________

परीक्षार्थींनी जर **भाषा** – I चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी खालील प्रश्नांची उत्तरे द्यावीत.

# भाग – IV
## भाषा – I
## मराठी

पुढील उतारा वाचा आणि विचारलेल्या प्रश्नांची योग्य तो पर्याय निवडून उत्तरे लिहा :

हादगा किंवा भोंडल्याचा खेळ खेळताना भिंतीवर समोरासमोर उभ्या असलेल्या दोन हत्तींचे चित्र रंगाने चितारलेले असते. त्यांच्या सोंडेत एक फुलांची माळ काढलेली असते, तर रोजच्या खेळात पाटावर रांगोळीने हत्तीचे चित्र काढतात किंवा त्यासाठी खडू वापरला जातो. काही ठिकाणी हत्तीच्या चित्राऐवजी चार खडे पाटावर ठेवतात. त्याला झेंडू, कोरांटी, मखमल यांची फुले वाहतात. शिवाय फळभाज्या वाहतात. हत्ती हे प्रजननाचे प्रतीक असते. पाटावरचे चार खडे हे बाल्य, तारुण्य, प्रौढत्व व वार्धक्याचे प्रतीक बनतात. त्या महिन्यात उपलब्ध असणारी फळे आणून त्यांची माळ या हादगा देवाला अर्पण केली जाते. हा सोहळा एखाद्याच्या घरात, स्वयंपाकघरात, घरासमोरच्या अंगणात अथवा एखाद्या मोकळ्या जागेत-कुठेही साजरा केला जातो. यासाठी दहा-बारा मुली छान कपडे घालून एकत्र येतात. हातात हात घेऊन त्या हादग्याभोवती गोल रिंगण तयार करतात आणि अतिशय सुरेल अशी गीते गातात. प्रत्येक दिवशी एकेक गीत वाढवीत जातात. सोळा दिवसांत सोळा गीते म्हटली जातात. त्यानंतर खिरापत वाटली जाते. तिची संख्याही अशीच वाढवितात. ही खिरापत झाकून आणायची व जमलेल्या मुलींनी ती ओळखायची, अशी छान पद्धत असते. या गाण्यामध्ये सासर-माहेर यांतली तुलना असते. सुखदु:खाचे प्रसंग असतात. सासूबाईचा हट्टीपणा असतो. पतीविषयी पत्नीने केलेली लाडीक तक्रार असते. हे गाणे आधी एक जण म्हणते. नंतर साऱ्या जणी फेर धरत जागच्याजागी डुलत-डुलत अगदी मंदपणे तिच्या पाठीमागून म्हणतात. हा हादगा काही वेळा आळीपाळीने प्रत्येक मुलीच्या घरीही साजरा केला जातो. वडीलधाऱ्या बायका नवीन गीतेही शिकवितात.

खानदेश, विदर्भात भुलाईचा सोहळा जवळजवळ असाच साजरा करतात. इथे पाटावर हत्तीचे चित्र काढण्याऐवजी घराच्या दिवळीत किंवा कोनाड्यात भुलोबा-भुलाईची मातीची चित्रे मांडतात. या चित्रांची फळाफुलांनी पूजा करतात. पावसाच्या कृपेने आणि भूमीच्या नवनिर्माणक्षमतेने जे जे जन्माला येते, ते ते आधी या भूमीचे प्रतीक असलेल्या भुलाईला अर्पण करायचे, अशी यामागची भावना असते. फूल पावित्र्याचे प्रतीक, फळ समृद्धीचे प्रतीक, पान चैतन्य आणि जगण्याच्या आसक्तीचे प्रतीक म्हणून अर्पण केले जाते. भाद्रपदातील पौर्णिमेपासून कोजागिरी (आश्विन) पौर्णिमेपर्यंत या भुलाईची पूजा चालते. नंतर भुलाईचे विसर्जन करतात.

91. हत्ती हे कशाचे प्रतीक असते ?
   (1) शक्तीचे
   (2) स्थूलपणाचे
   (3) प्रजननाचे
   (4) लक्ष्मीचे

92. खिरापत म्हणजे काय ?

(1) अहेर

(2) देणगी

(3) वाटला जाणारा खाद्यपदार्थ

(4) मेजवानीतला पदार्थ

93. फळांची माळ कोणाला अर्पण केली जाते ?

(1) हादगा देवाला

(2) हत्तीला

(3) गाणाऱ्या मुलींना

(4) वडीलधाऱ्या बायकांना

94. भुलाईची पूजा करण्यामागची मुख्य भावना कोणती आहे ?

(1) दहशत

(2) कृतज्ञता

(3) भीती

(4) सुखदु:ख

95. 'जमलेल्या मुलींनी' - यामध्ये 'जमलेल्या' हे __________ आहे.

(1) विशेषण

(2) क्रियापद

(3) नाम

(4) क्रियाविशेषण

96. 'वार्धक्य' शब्दाचा समानार्थी शब्द कोणता ?

(1) वाढ

(2) वृद्ध

(3) वर्धमान

(4) म्हातारपण

97. 'उपलब्ध' शब्दाचा विरुद्धार्थी शब्द कोणता ?

(1) सहज मिळणारा

(2) जवळचा

(3) दुर्मीळ

(4) निरुपयोगी

98. पाटावर हत्तीचे चित्र कशाने काढलेले असते ?

(1) रांगोळी किंवा रंग

(2) खडू किंवा रंगीत माती

(3) शाई किंवा रांगोळी

(4) रांगोळी किंवा खडू

99. हादग्याच्या गाण्यामध्ये खालीलपैकी कोणता विषय असतो ?

(1) बाल्य व तारुण्य यांची तुलना

(2) सासर माहेर यांची तुलना

(3) सणांची तुलना

(4) गाण्यांची तुलना

पुढील कविता वाचा आणि विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे योग्य तो पर्याय निवडून लिहा.

खोदकांम करताना विसाव्या शतकांतले शहर सांपडले
कागदासारखे कुणी आपल्या अजस्र मुठीत चुरगाळले
भेलकांडलेली यंत्रचाके; थोटकासारखी गिरणीची धुराडी
यंत्रयुगाची येवढीच चाहूल, बाकी स्थिती मोहोंजोदारोतली
हातभर कुठंही खोदा, दगड गोटे मूर्ती शेंदरांनी माखलेल्या
काही तोंडाला सोंड फुटलेल्या, काही शेपूट अधांतरी तुटलेल्या.

बरे झाले या वर्षी म्युझियमचे दालन खूप छान सजले
भुसा भरून धर्म नावाचे सोंग पुढल्या पिढ्यांना दाखवावे
अरे ही पाटी कसली 'पाणपोई सर्व जातिधर्मांना खुली'
म्हणजे माणसामाणसांत का होत्या उच्चनीच उतरंडी !
छान केले, असले शहर मातीत गाडण्याच्या लायकीचे
कसले ते यंत्रयुग, विसाव्या शतकात दर्शन अश्मयुगाचे !

**100.** 'भुसा भरून' मध्ये कोणता अलंकार आहे ?
(1) अनुप्रास
(2) रूपक
(3) उत्प्रेक्षा
(4) स्वभावोक्ती

**101.** कवीला शहर मातीत गाडण्याच्या लायकीचे का वाटते ?
(1) तिथे यंत्रयुग होते.
(2) तिथे अश्मयुगाचे दर्शन होत होते.
(3) तिथे माणसा-माणसांत उच्चनीच भेदभाव होता.
(4) ते मोहेंजोदारोसारखे होते.

**102.** पुढीलपैकी कोणते शीर्षक या कवितेला सर्वात योग्य ठरेल ?
(1) पाणपोई
(2) शहर
(3) खोदकाम
(4) धर्म

**103.** 'विसाव्या शतकात दर्शन अश्मयुगाचे' या ओळीतून कवीला काय सुचवायचे आहे ?
(1) विसाव्या शतकात माणसांनी प्रगती केली आहे.
(2) विसाव्या शतकात पुरेशी यंत्रे वापरली जात नाहीत.
(3) विसाव्या शतकातली माणसे अश्मयुगातील माणसांप्रमाणे दिसतात.
(4) या शतकात माणसांचे विचार मागासलेलेच राहिले आहेत.

**104.** यंत्रयुगाची चाहूल कोणत्या गोष्टींतून दिसून येते
(1) दगडगोटे व मूर्ती
(2) यंत्रचाके व धुराडी
(3) खोदकाम व शहर
(4) पाटी व पाणपोई

**105.** 'अजस्र' शब्दाचा अर्थ ________ हा आहे.
(1) जास्त
(2) अमर
(3) अस्त्र
(4) प्रचंड

योग्य पर्याय निवडून पुढील प्रश्नांची उत्तरे द्या.

**106.** वाचन करताना, विद्यार्थ्यांना वाक्याच्या किंवा मजकुराच्या वेगवेगळ्या भागांमधील संबंध समजायला पुढीलपैकी कशाची मदत होते ?
(1) क्रियाविशेषणे
(2) सर्वनामे
(3) विशेषनामे
(4) क्रियापदबंध (Phrasal Verbs)

**107.** पुढीलपैकी कोणते वाक्य बरोबर आहे ?
(1) रोहनने अपघातात पडलेल्या दाताच्या जागी नवा दात बसवला.
(2) रोहनने अपघातात पडक्या दाताच्या जागी नवा दात बसवला.
(3) रोहनने अपघातात पडणाऱ्या दाताच्या जागी नवा दात बसवला.
(4) रोहनने अपघातात पडत्या दाताच्या जागी नवा दात बसवला.

**108.** खालीलपैकी कोणते वाक्य श्रवणवर्तनाचे वर्णन करत नाही ?

(1) लक्षपूर्वक ऐकण्याने वक्त्यांच्या कृतींचा अंदाज येतो.

(2) लोक निवडपूर्वक ऐकायला शिकतात. आणि जे ऐकायचे नाही त्याकडे दुर्लक्ष करू शकतात.

(3) चांगला श्रोता होण्याची क्षमता उपजत असते आणि प्रशिक्षणाशिवाय प्राप्त होऊ शकते.

(4) संज्ञापनातील किमान निम्मा भाग श्रवणप्रक्रियेचा असतो.

**109.** 'पाणी' शब्दाचा उच्चार शिकवताना तुम्ही

(1) विद्यार्थ्याला मराठीतील मिळत्याजुळत्या शब्दाचा पर्याय म्हणून वापर करण्यासाठी उत्तेजन देता.

(2) त्या शब्दाचा अर्थ शोधून वर्गाला सांगता.

(3) उच्चार शब्दकोश वापरून तो शब्द वर्गाने ऐकावा म्हणून उच्चारता.

(4) तो परभाषेतील शब्द आहे असे विद्यार्थ्यांना सांगता.

**110.** गोष्टीचे शीर्षक, प्रकरणांचे मथळे, दृश्यमाहिती यांच्या मदतीने गोष्टीच्या विषयाचा विचार करा आणि तुम्हाला ज्याविषयी उत्सुकता आहे त्याची नोंद करा.

ही वाचनकृती पुढीलपैकी कोणती प्रक्रिया आहे ?

(1) दृश्यीकरण

(2) शब्दांचा मारा

(3) पूर्वज्ञानाचा वापर

(4) अंदाज

**111.** उपाहारगृहातील खालील निवेदनाचा अभ्यास करा. पुढीलपैकी कोणत्या ओळीत चूक आहे.

आस्वादासाठी तयार आहे - झणझणीत तांबडा पांढरा रस्सा

आणि चविष्ट खिमापुलाव, चिकनबिर्याणी ताज्या बोकडाचे मटण

(1) 1ली आणि 2री ओळ

(2) फक्त 1ली ओळ

(3) 1ली आणि 3री ओळ

(4) फक्त 3री ओळ

**112.** संशोधनाच्या तत्त्वामधून (Principle of Discovery) असे सूचित होते की व्याकरणाच्या वर्गात

(1) विद्यार्थी व्याकरणावर आधारित अशा कृती करत असतात की ज्यामध्ये सहयोगाचा विचार करण्याची आवश्यकता असते.

(2) विद्यार्थी अनेक उदाहरणांवरून काही नियम तयार करतात.

(3) विद्यार्थी कृती पूर्ण करताना व्याकरणाच्या नियमांचा जाणीवपूर्वक विचार करतात.

(4) विद्यार्थ्यांना व्याकरणाच्या चुका टाळण्यासाठी शिक्षकांची मदत मिळते.

**113.** अभिरुची बुद्धिमत्ता (Kinesthetic Intelligence) म्हणजे अशी अध्ययनक्षमता ज्यामध्ये

(1) विद्यार्थ्यांमध्ये अत्यंत विकसित अशी श्रवणकौशल्ये असतात आणि ते चित्रांपेक्षा शब्दांच्या माध्यमातून विचार करतात.

(2) समतोलाची आणि दृष्टी व हात यांच्या समन्वयाची योग्य जाणीव ठेवून केलेल्या हालचालीतून स्वत:ला व्यक्त करतात.

(3) त्यांचा संगीताकडे कल असतो आणि ते ध्वनी, लय आणि आकृतिबंधांच्या माध्यमातून विचार करतात.

(4) माहितीचे तुकडे जुळवून, तर्कशास्त्रीय आणि संख्यात्मक आकृतिबंधांमधून संबोधात्मक विचार करतात.

114. विद्यार्थ्यांच्या विशिष्ट शैक्षणिक अभियोग्यतेमध्ये (aptitude) खालील निरीक्षणांचा समावेश असतो.

(1) विद्यार्थी अनपेक्षित व कधीकधी 'वेडेपणाचे' प्रतिसाद देतो.

(2) इतरांकडे असलेल्या क्षमता आणि कौशल्ये ओळखतो.

(3) त्याच्याकडे शारीरिक सौष्ठव असते.

(4) आवडीच्या विषयांकडे दीर्घकाळ लक्ष देऊ शकतो.

115. पूर्वानुभवावर आधारित चांगल्या मराठी संज्ञापनावर अवलंबून असणे म्हणजे

(1) संकल्पना तयार करणे

(2) अध्ययन प्रक्रियेचे संक्रमण

(3) प्रश्न विचारण्याचे तंत्र

(4) प्रात्यक्षिक करून दाखवणे

116. शिक्षक प्रशिक्षणाच्या तंत्रात प्रतिभासाचा (Simulation) उपयोग कोणत्या कौशल्यांचा विकास करण्यासाठी होतो ?

(1) पाठनियोजन

(2) व्हिडिओ प्रात्यक्षिक पाहणे

(3) सूक्ष्मलक्ष्यी अध्यापन

(4) व्याख्यानाची चांगली टिपणे काढणे

117. लेखनप्रक्रियेच्या कोणत्या टप्प्यामध्ये मुक्तलिखाण, विचारमंथन, समूहीकरण (Clustering) आणि कल्पनेचे क्षमता मापन (Idea mapping) हे सर्वात महत्त्वाचे असते ?

(1) पूर्वलेखन

(2) मसुदालेखन

(3) उजळणी

(4) मुद्रितशोधन

118. पुढील शब्द कोणत्या वर्गात मोडतात ?

निष्काळजीपणे, आज, मोठ्याने, सावकाश, उद्या, इथे, रागाने, कुठेही, आनंदाने, नंतर, सगळीकडे.

(1) नामे

(2) सहाय्यक क्रियापदे

(3) क्रियाविशेषणे

(4) सर्वनामे

119. लेखनकृतीचा उत्तम क्रम कोणता ?

(1) संकलन, क्रमानुसार लावणे, मसुदा तयार करणे, सुधारित मसुदा तयार्र करणे.

(2) संकलन, क्रमानुसार लावणे, सुधारित मसुदा तयार करणे, मसुदा तयार करणे.

(3) क्रमानुसार लावणे, संकलन, मसुदा तयार करणे, सुधारित मसुदा तयार करणे.

(4) मसुदा तयार करणे, संकलन, क्रमानुसार लावणे, सुधारित मसुदा तयार करणे.

120. भाषावर्गात वाङ्मयातून विद्यार्थ्यांना

(1) कोणत्याही सांस्कृतिक बाबींचा परिचय होऊ शकत नाही.

(2) भाषेतील अस्सल वैविध्यांची व्याप्ती समजू शकत नाही.

(3) मराठीच्या जुन्या शैलींचा परिचय होऊ शकत नाही.

(4) कठीण शब्दांचा संग्रह मिळतो.

परीक्षार्थींनी जर **भाषा** – II चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी खालील प्रश्नांची उत्तरे द्यावीत.

# भाग – V
# भाषा – II
# मराठी

पुढील उतारा वाचा आणि विचारलेल्या प्रश्नांची योग्य तो पर्याय निवडून उत्तरे लिहा.

ही गोष्ट शिवाजी महाराजांच्या काळातली आहे. रायगडावर घडलेली. तो दिवस कोजागिरी पौर्णिमेचा होता. रायगडावर मोठा उत्सव साजरा केला जाणार होता. गवळी दूध घेऊन गडावर जात होते. काही गवळणीही निघाल्या होत्या. गडाखाली एक छोटं गाव होतं. त्या गावात हिरा नावाची गवळण राहत होती. तिलाही दूध घेऊन गडावर जायचं होतं. तिने दुधानी भांडी भरून ठेवली होती; पण तिचं बाळ झोपल्याशिवाय ती गडावर जाऊ शकत नव्हती.

थोड्यावेळानी हिरा दूध विकायला गडावर निघाली. तिला खूप उशीर झाला होता. ती गडावर पोचली तेव्हा इतरांनी आपलं सगळं दूध विकलं होतं. दूध विकत घेणारंही कोणी दिसत नव्हतं. त्यामुळे तिच्या जवळचं दूध संपायला बराच वेळ लागला. दिवस केव्हा मावळला हे तिच्या लक्षातही आलं नाही.

आपल्या लहान बाळाच्या ओढीनं ती घाईघाईनी निघाली. मुख्य दरवाजाजवळ आली. गडाचा दरवाजा बंद झाला होता. लगेच ती पहारेकऱ्याकडे गेली. त्याला कळवळून म्हणाली, "बाबा, मी हात जोडते. दरवाजा उघडा. मला घरी जाऊ द्या. माझं बाळ घरी एकटंच आहे." चौकीदार म्हणाला, "मला दरवाजा उघडता येणार नाही. गडावरचे दरवाजे दिवस मावळला की बंद होतात आणि दिवस उजाडला की उघडतात. महाराजांचा तसा हुकूमच आहे." हिरानं पुन्हा त्याची विनवणी केली; पण त्याचा काही उपयोग झाला नाही. ती हताश झाली. गडाखाली कसं उतरावं हे तिला कळंत नव्हतं. कुठून खाली उतरता येईल याचा विचार ती करायला लागली. ती गडावर इकडे तिकडे वाट शोधायला लागली; पण तिला वाट सापडली नाही. तिच्या डोळ्यांसमोर तिचं भुकेलेलं बाळ दिसायला लागलं. गड उतरायचा तिनी निश्चय केला. एका कड्याजवळ आली. कडा खूपच उभा होता. बाळाच्या ओढीनं ती कडा उतरायला लागली; पण झाडाच्या एका फांदीमुळे ती वाचली. शेवटी अतिशय अवघड कडा उतरून हिरा गडाखाली आली. बाळाला भेटण्यासाठी ती धावत धावत घरी गेली. बाळ रडत होतं. तिनी बाळाला उचलून घेतलं आणि त्याचे पापे घेतले. आईला पाहून बाळ हसायला लागलं. पुढे ही हकीकत शिवाजी महाराजांना कळली. हिराच्या या धाडसाचं त्यांना ही नवल वाटलं. त्यांनी तिला बोलावून घेतलं. तिला साडी चोळी देऊन तिचा सन्मान केला. हिरानं हे धाडस आपल्या बाळासाठी केलं होतं. ज्या कड्यावरून हिरा गड उतरून खाली गेली तिथं महाराजांनी एक बुरूज बांधला. तो आजही रायगडावर आहे. त्यालाच 'हिरकणीचा बुरूज' म्हणतात.

**121.** चौकीदार हिरकणीसाठी गडाचा दरवाजा उघडत नव्हता.

(1) त्याला हिराबद्दल सहानुभूती नव्हती.

(2) तो महाराजांचा हुकूम पाळत होता.

(3) त्याला हिराच्या बाळाची काही काळजी नव्हती.

(4) त्याच्याकडे दरवाजाची किल्ली नव्हती.

**122.** 'नवल' म्हणजे काय ?

(1) नवेपणा

(2) नवी गोष्ट

(3) आश्चर्य

(4) नकार

**123.** हिराने कडा उत्तरायचे धाडस का केले ?

(1) आपल्या बाळासाठी

(2) रात्र फार झाली होती म्हणून

(3) साहस करण्यासाठी

(4) कडा अवघड होता म्हणून

**124.** बुरजाला 'हिरकणीचा बुरूज' असे नाव का दिले ?

(1) हिराने विनंती केली होती म्हणून

(2) बुरूज हिराने बांधला होता म्हणून

(3) हिराची आठवण म्हणून

(4) हिराच्या धाडसाची आठवण म्हणून

**125.** चौकीदाराचा स्वभाव कसा होता ?

(1) कर्तव्यकठोर

(2) निर्दय

(3) निष्काळजी

(4) बेजबाबदार

**126.** हिराला दूध विकत घेणारे कोणीही का दिसत नव्हते ?

(1) तिच्याकडचे दूध चांगले नव्हते.

(2) तिचे दूध विकण्याकडे लक्ष नव्हते.

(3) तिला उशीर झाला होता.

(4) दिवस मावळला होता.

**127.** 'मावळणे' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द कोणता ?

(1) थांबणे

(2) ओघळणे

(3) माळणे

(4) उगवणे

**128.** हिरा गडावर का जाऊ शकत नव्हती ?

(1) दुधाचे भांडे भरले नव्हते

(2) तिचे बाळ झोपले नव्हते

(3) तिच्याबरोबर गवळण नव्हती

(4) तिचे बाळ झोपले होते

**129.** 'ते दरवाजे उघडतात' हे वाक्य अपूर्ण भूतकाळात लिहा.

(1) त्यांनी दरवाजे उघडले

(2) ते दरवाजे उघडतील

(3) ते दरवाजे उघडत होते

(4) त्यांनी दरवाजे उगडले होते

पुढील उतारा वाचा आणि योग्य पर्याय निवडून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार मनात आला, की मला एकलव्याची आठवण येते. गुरू द्रोणाचार्यांनी त्याला विद्या देण्याचे नाकारले; पण त्याचे विद्याप्रेम इतके उत्कट होते, की त्याने द्रोणाचार्यांचा मातीचा पुतळा तयार केला आणि त्याच्यासमोर स्वप्रयत्नाने अशी धनुर्विद्या मिळवली, की तो धनुर्विद्येत सर्वश्रेष्ठ झाला.

ग्रंथ हेसुद्धा असेच गुरू असतात. परदेशात शिकत असताना बाबासाहेब आंबेडकरांजवळ पुस्तके घ्यायला पैसे नसत; म्हणून ते ग्रंथालयात जाऊन बसत. जितका वेळ ग्रंथालय उघडे असेल, तितका वेळ ते तिथे पुस्तके वाचण्यात घालवत. जेवणात वेळ वाया जाऊ नये; म्हणून वाचता वाचता ग्रंथपालांची नजर चुकवून पावाचे दोन तुकडे खात.

ग्रंथपालांनी एकदा ते पाहिले व त्यांना बोलावून म्हणाले, "वाचक महाशय, ग्रंथालयात बसून काहीही खायला मनाई आहे, हे आपल्याला माहीत नाही काय ? भिंतीवरचा तो फलक पाहिला नाही काय ?"

आंबेडकर म्हणाले, "नियम मला माहीत आहे; पण काय करू ? पुस्तके घेण्याइतके पैसे मजजवळ नाहीत; म्हणून ग्रंथालय जितका वेळ उघडे असते, तितका वेळ बसून, एक क्षणही वाया न घालवता वाचतो. मग वाचता वाचता दोन घास खाऊन घेतो झाले !"

ग्रंथपाल म्हणाले, "नियम माहीत असून तुम्ही तो मोडला आहे. तुम्हांला आता शिक्षा करावी लागेल."

आंबेडकर म्हणाले, "अपराधाची माफी असावी. उपाशीपोटी इथे वाचत बसेन. मग तर झाले ?"

ग्रंथपाल म्हणाले, "नियम माहीत असून अपराध करणाऱ्याला माफ करता येत नाही, समजलात ?"

आंबेडकर म्हणाले, "ग्रंथालयाचे दरवाजे माझ्यासाठी बंद करण्याची शिक्षा सोडून दुसरी कोणतीही शिक्षा भोगायला मी तयार आहे."

ग्रंथपाल म्हणाले, "शब्द दिला आहेस, मागून फिरवणार नाही ना ?"

आंबेडकर म्हणाले, "दिलेला शब्द मोडला, तर वाचून उपयोगच काय" ?

ग्रंथपाल म्हणाले, "वाचक महाशय, ऐका तर शिक्षा. उद्यापासून तुम्ही माझ्याबरोबर जेवायचे. मी दोन माणसांचे जेवण घरून आणत जाईन."

आंबेडकरांचे डोळे भरून आले नि म्हणाले, "अशी प्रेमळ शिक्षा कोण नाकारील ?"

130. आंबेडकर पुस्तके वाचता वाचता पावाचे दोन तुकडे खात, कारण

(1) त्यांना पाव आवडत असे

(2) जेवणात वेळ वाया जाऊ नये म्हणून

(3) त्यांना पुस्तके वाचताना खायला आवडत असे

(4) त्यांना ग्रंथालयाचा नियम माहीत नव्हता

131. उताऱ्यावरून ग्रंथपालाचा कोणता गुण दिसून येतो ?

(1) ग्रंथप्रेम

(2) नियम मोडणे

(3) प्रेमळपणा

(4) निर्दयपणा

132. एकलव्यासाठी खालीलपैकी कोणता शब्द योग्य ठरेल ?

(1) शिल्पकार

(2) श्रेष्ठ शिष्य

(3) श्रेष्ठ गुरू

(4) श्रेष्ठ योद्धा

133. 'मनाई' शब्दाचा समानार्थी शब्द कोणता ?

(1) बंदी

(2) परवानगी

(3) जबरदस्ती

(4) संमती

134. 'वाचून उपयोगच काय ?' हे वाक्य विधानार्थी करा.

(1) वाचनाचा उपयोग होईल.

(2) वाचनाचा काय उपयोग ?

(3) वाचून उपयोग नाही.

(4) वाचन करूच नये.

135. डॉ. आंबेडकरांमध्ये एकलव्याचा कोणता गुण दिसतो ?

(1) गुरूप्रेम

(2) पुस्तकप्रेम

(3) धनुर्विद्या

(4) उत्कट विद्याप्रेम

136. वाचनाच्या या चाचणीत तुम्ही गुणदान कसे कराल ?

प्रश्न : धरमशाला कुठे आहे ?

उत्तर (1) हिमाचल प्रदेशात

उत्तर (2) धरमशाला हिमाचल प्रदेशात आहे.

(1) उत्तर 2 ला 2 गुण, उत्तर 1 ला 0 गुण

(2) उत्तर 1 ला 1 गुण, उत्तर 2 ला 2 गुण

(3) उत्तर 1 ला 2 गुण, उत्तर 2 ला 2 गुण

(4) उत्तर 2 ला 1½ गुण, उत्तर 1 ला 1 गुण

137. विस्तृत वाचन म्हणजे

(1) अपरिचित शब्दांच्या अर्थाचा अंदाज बांधणे

(2) विषय सर्वसाधारणपणे समजण्यासाठी व आनंदासाठी वाचणे.

(3) मध्यवर्ती कल्पना समजण्यासाठी वाचणे.

(4) उताऱ्याच्या सर्वसाधारण आशयाबाबत अनुमान करणे.

138. श्रवणकौशल्यांची चाचणी घेण्यासाठी, शिक्षकाने एक कृती तयार केली आहे. ही चाचणी कशावर आधारित असावी ?

(1) विद्यार्थ्यांनी चित्राचा अर्थ लावणे.

(2) लघुपट पाहून त्याचे परीक्षण करणे.

(3) ध्वनिमुद्रणावर आधारित तालिका पूर्ण करणे.

(4) मजकूर मोठ्याने वाचण्याची चाचणी घेणे.

**139.** पृच्छाधारित अध्ययनामध्ये

(1) शिक्षक विद्यार्थ्यांना कृती देऊन अध्ययनाला मदत करतो.

(2) विद्यार्थी स्वत:च्या पद्धतीने प्रश्न विचारतात

(3) (1) व (2) दोन्ही

(4) फक्त (2)

**140.** 'नदी आपल्याला जीवन देते' या वाक्यात कोणता अलंकार आहे ?

(1) श्लेष

(2) अतिशयोक्ती

(3) रूपक

(4) उत्प्रेक्षा

**141.** बाळाचा चेहरा कमळासारखा आहे. अधोरेखित शब्दातून कोणता अलंकार सूचित होतो ?

(1) अतिशयोक्ती

(2) उत्प्रेक्षा

(3) उपमा

(4) रूपक

**142.** वाचनपूर्व तासिकेंत प्रत्यक्ष वाचन सामग्री न वापरता चर्चा करणे हे पुढीलपैकी कशाशी सर्वात जास्त संबंधित आहे ?

(1) जनकसूत्री रचनांतरणवादी पद्धती (Generative – transformatinal approach)

(2) रासीयस पद्धती (rassias method)

(3) व्याकरण-भाषांतर पद्धती (grammar translation method)

(4) श्रवण-भाषण पद्धती (audio-lingual method)

**143.** विरामचिह्ने: योग्य पर्याय निवडा.

(1) या सभेचे अध्यक्ष असतील इंद्रनाथ. साहित्य अकादमीचे सचिव

(2) या सभेचे अध्यक्ष असतील इंद्रनाथ, साहित्य अकादमीचे सचिव.

(3) या सभेचे अध्यक्ष असतील इंद्रनाथ – साहित्य अकादमीचे सचिव

(4) या सभेचे अध्यक्ष असतील इंद्रनाथ "साहित्य अकादमीचे सचिव."

**144.** ज्या शाळा सर्वसाधारण आणि विशेष शिक्षण यात फरक करत नाहीत त्या पुढीलपैकी कोणत्या प्रकारात मोडतात ?

(1) विशेष (Specialised)

(2) अपवर्जक (Exclusive)

(3) प्रमाणित (Standard)

(4) समावेशक (Inclusive)

**145.** प्रत्येक सत्राच्या शेवटी शिक्षक विद्यार्थ्यांची श्रुतआकलनाची, भाषणाची, वाचनाची आणि लेखनाची चाचणी घेतात. या मूल्यमापनाच्या पद्धतीचे उद्दिष्ट बहुश: कोणते असते ?

(1) भाषा अध्ययनासाठी लागणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अभियोग्यतेचे मापन करणे

(2) अभ्यासक्रमाच्या उद्दिष्टांची व्याख्या करण्यासाठी शिक्षकाला मदत करणे

(3) विद्यार्थ्यांच्या एकूण नैपुण्याचे मापन करणे

(4) विद्यार्थ्यांचे भाषावर्गाबद्धलचे दृष्टिकोन निश्चित करणे.

**146.** ई-अध्ययन म्हणजे

(1) दूरशिक्षण

(2) सक्रियपणे एकात्म करणारे हार्डवेअर

(3) तंत्रज्ञान वापरून केलेले मिश्र शिक्षण

(4) माहितीपट

**147.** जर एखाद्या शिक्षकाला तमीळच्या वाचन-पाठात अस्सल साहित्य वापरायचे असेल तर त्याने खालीलपैकी कोणते साहित्य वापरण्याची गरज नाही ?

(1) तमीळ वर्तमानपत्र

(2) तमीळमध्ये भाषांतरित झालेला इंग्रजी वर्तमानपत्रातला मदुराईवरचा लेख

(3) तमीळनाडूतल्या कंपनीने वापरलेला तमीळ भाषेतला नोकरीसाठीचा अर्ज

(4) कोईमतूरमधल्या रस्त्यावरच्या पाट्यांची छायाचित्रे.

**148.** शब्दरहित संज्ञापन म्हणजे

(1) उच्चारलेले शब्द

(2) हावभाव

(3) संख्या

(4) छापलेले शब्द

**149.** योग्य पर्याय निवडून पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा सहकार्याधारित गटअध्ययनामध्ये पुढीलपैकी कोणते फायदे नाहीत ?

(1) विद्यार्थ्यांच्या सरावासाठी दिलेला वर्गाचा अधिक वेळ.

(2) अधिक शांत व सुव्यवस्थित वर्ग.

(3) शिक्षककेंद्री शिक्षणाला पर्याय

(4) लगेच परावृत्त होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवृत्त करण्यासाठी सहाध्यायांचा सहभाग.

**150.** वाचनप्रक्रियेत अनुमान काढणे या कौशल्यामध्ये पुढीलपैकी कशाचा समावेश असतो ?

(1) उताऱ्यात दिलेल्या घटकांचा न दिलेल्यां घटकांशी संबंध जोडणे.

(2) वाचनासाठी निवडलेल्या उताऱ्याच्या विविध भागांमध्ये दिलेल्या माहितीचा परस्परसंबंध जोडणे.

(3) वाचनासाठीच्या उताऱ्याच्या फलिताबाबत विचारपूर्वक अंदाज बांधणे.

(4) अपरिचित शब्दांचा अर्थ शोधून काढणे.

## SPACE FOR ROUGH WORK

## SPACE FOR ROUGH WORK

## SPACE FOR ROUGH WORK

**खालील सूचना काळजीपूर्वक वाचा :**

1. प्रत्येक प्रश्नासाठी दिलेल्या चार पर्यायांपैकी बरोबर उत्तरासाठी OMR उत्तरपत्रिकेच्या बाजू-2 वर केवळ एकच वर्तुळ निळ्या किंवा काळ्या बॉल पॉइन्ट पेन ने संपूर्ण निळे/काळे भरा. एकदा उत्तराचे वर्तुळ भरल्यावर वे बदलता येणार नाही.

2. परीक्षार्थींनी उत्तर पत्रिकेला कोठेही घडी पडणार नाही किंवा त्यावर कुठलीही असंबद्ध खूण केली जाणार नाही याची काळजी घ्यावी. परीक्षार्थींनी आपला अनुक्रमांक उत्तर पत्रिकेत नेमून दिलेल्या जागेव्यतिरिक्त अन्यत्र लिहू नये.

3. चाचणी-पुस्तिका आणि उत्तरपत्रिका काळजीपूर्वक हाताळा. कारण कोणत्याही परिस्थितीत (चाचणी-पुस्तिकेचा कोड अथवा क्रमांक आणि उत्तरपत्रिकेचा कोड अथवा क्रमांक यांमधील विसंगती वगळता) दुसरा संच पुरविला जाणार नाही.

4. चाचणी-पुस्तिका/उत्तरपत्रिका यांवर दिलेला कोड आणि क्रमांक परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर बरोबर लिहावा.

5. परीक्षार्थींना कोणतीही पाठ्यपुस्तकाची सामग्री, मुद्रित अथवा लिखित, कागदाचे तुकडे, पेजर, मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण अथवा प्रवेशपत्रिकाव्यतिरिक्त अन्य कोणतीही सामग्री परीक्षेच्या सभा गृहात/खोली मध्ये आणण्याची परवानगी नाही.

6. प्रत्येक परीक्षार्थीने त्याची/तिची प्रवेश-पत्रिका पर्यवेक्षकांनी मागितल्यावर त्यांना दाखवली पाहिजे.

7. पर्यवेक्षक अथवा अधीक्षक यांच्या खास परवानगीशिवाय कोणत्याही परीक्षार्थीला आपली जागा सोडता येणार नाही.

8. कामावर असलेल्या पर्यवेक्षकांकडे उत्तरपत्रिका दिल्याखेरीज आणि उपस्थिती पृष्ठावर दोनदा सही केल्या खेरीज परीक्षार्थींनी परीक्षागृह सोडू नये. ज्या परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर दुसऱ्यांदा सही केलेली नसेल त्यांची उत्तर पत्रिका पर्यवेक्षकाकडे दिली गेलेली नाही, असे समजले जाईल आणि ती बाब अनुचित साधनाची बाब मानली जाईल.

9. इलेक्ट्रॉनिक/हस्तसंचालित गणितयंत्रा (Calculator) चा उपयोग निषिद्ध आहे.

10. परीक्षागृहातील वर्तणुकीबाबत परीक्षार्थींना बोर्डाच्या नियमांचे पालन करावे लागेल. अनुचित साधनाच्या सर्व बाबींचा निर्णय बोर्डाच्या नियमांनुसार केला जाईल.

11. चाचणी-पुस्तिका अथवा उत्तरपत्रिका यांचा कोणताही भाग कोणत्याही परिस्थितीत सुटा करू नये.

12. **चाचणी पूर्ण झाल्यानंतर परीक्षार्थींनी उत्तरपत्रिका परीक्षागृहातील पर्यवेक्षकाकडे दिली पाहिजे. *चाचणी-पुस्तिका परीक्षार्थी आपल्याबरोबर घेऊन जाऊ शकतात.***

**READ CAREFULLY THE FOLLOWING INSTRUCTIONS:**

1. Out of the four alternatives for each question, only one circle for the correct answer is to be darkened completely with Blue/Black Ball Point Pen on Side-2 of the OMR Answer Sheet. The answer once marked is not liable to be changed.
2. The candidates should ensure that the Answer Sheet is not folded. Do not make any stray marks on the Answer Sheet. Do not write your Roll No. anywhere else except in the specified space in the Answer Sheet.
3. Handle the Test Booklet and Answer Sheet with care, as under no circumstances (except for discrepancy in Test Booklet Code or Number and Answer Sheet Code or Number), another set will be provided.
4. The candidates will write the correct Test Booklet Code and Number as given in the Test Booklet / Answer Sheet in the Attendance Sheet.
5. Candidates are not allowed to carry any textual material, printed or written, bits of papers, pager, mobile phone, electronic device or any other material except the Admit Card inside the examination hall/ room.
6. Each candidate must show on demand his / her Admission Card to the Invigilator.
7. No candidate, without special permission of the Superintendent or Invigilator, should leave his / her seat.
8. The candidates should not leave the Examination Hall without handing over their Answer Sheet to the Invigilator on duty and sign the Attendance Sheet twice. Cases where a candidate has not signed the Attendance Sheet a second time will be deemed not to have handed over the Answer Sheet and dealt with as an unfair means case.
9. Use of Electronic / Manual Calculator is prohibited.
10. The candidates are governed by all Rules and Regulations of the Board with regard to their conduct in the Examination Hall. All cases of unfair means will be dealt with as per Rules and Regulations of the Board.
11. No part of the Test Booklet and Answer Sheet shall be detached under any circumstances.
12. **On completion of the test, the candidate must hand over the Answer Sheet to the Invigilator in the Room / Hall. *The candidates are allowed to take away this Test Booklet with them.***

SEAL

**निम्नलिखित निर्देश ध्यान से पढ़ें :**

1. प्रत्येक प्रश्न के लिए दिए गए चार विकल्पों में से सही उत्तर के लिए OMR उत्तर पत्र के पृष्ठ-2 पर केवल एक वृत्त को ही पूरी तरह नीले/काले बॉल पॉइन्ट पेन से भरें । एक बार उत्तर अंकित करने के बाद उसे बदला नहीं जा सकता है ।
2. परीक्षार्थी सुनिश्चित करें कि इस उत्तर पत्र को मोड़ा न जाए एवं उस पर कोई अन्य निशान न लगाएँ । परीक्षार्थी अपना अनुक्रमांक उत्तर पत्र में निर्धारित स्थान के अतिरिक्त अन्यत्र न लिखें ।
3. परीक्षा पुस्तिका एवं उत्तर पत्र का ध्यानपूर्वक प्रयोग करें, क्योंकि किसी भी परिस्थिति में (केवल परीक्षा पुस्तिका एवं उत्तर पत्र के संकेत या संख्या में भिन्नता की स्थिति को छोड़कर) दूसरी परीक्षा पुस्तिका उपलब्ध नहीं करायी जाएगी ।
4. परीक्षा पुस्तिका / उत्तर पत्र में दिए गए परीक्षा पुस्तिका संकेत व संख्या को परीक्षार्थी सही तरीके से हाज़िरी-पत्र में लिखें ।
5. परीक्षार्थी द्वारा परीक्षा हॉल/कक्ष में प्रवेश कार्ड के सिवाय किसी प्रकार की पाठ्य सामग्री, मुद्रित या हस्तलिखित, कागज़ की पर्चियाँ, पेजर, मोबाइल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण या किसी अन्य प्रकार की सामग्री को ले जाने या उपयोग करने की अनुमति नहीं है ।
6. पूछे जाने पर प्रत्येक परीक्षार्थी, निरीक्षक को अपना प्रवेश-कार्ड दिखाएँ ।
7. अधीक्षक या निरीक्षक की विशेष अनुमति के बिना कोई परीक्षार्थी अपना स्थान न छोड़ें ।
8. कार्यरत निरीक्षक को अपना उत्तर पत्र दिए बिना एवं हाज़िरी-पत्र पर दुबारा हस्ताक्षर किए बिना परीक्षार्थी परीक्षा हॉल नहीं छोड़ेंगे । यदि किसी परीक्षार्थी ने दूसरी बार हाज़िरी-पत्र पर हस्ताक्षर नहीं किए तो यह माना जाएगा कि उसने उत्तर पत्र नहीं लौटाया है और यह अनुचित साधन का मामला माना जाएगा ।
9. इलेक्ट्रॉनिक / हस्तचालित परिकलक का उपयोग वर्जित है ।
10. परीक्षा-हॉल में आचरण के लिए परीक्षार्थी बोर्ड के सभी नियमों एवं विनियमों द्वारा नियमित हैं । अनुचित साधनों के सभी मामलों का फैसला बोर्ड के नियमों एवं विनियमों के अनुसार होगा ।
11. किसी हालत में परीक्षा पुस्तिका और उत्तर पत्र का कोई भाग अलग न करें ।
12. **परीक्षा सम्पन्न होने पर, परीक्षार्थी कक्ष / हॉल छोड़ने से पूर्व उत्तर पत्र कक्ष-निरीक्षक को अवश्य सौंप दें । *परीक्षार्थी अपने साथ इस परीक्षा पुस्तिका को ले जा सकते हैं ।***